GOVERNMENT OF MAHARASHTRA
MAHARASHTRA STATE COMMON ENTRANCE TEST (CET) CELL
8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001
Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org

No.MED-1026/CR.No.83/UG-2026/CAP-2/CVC/Extension/2218 Date : 09/09/2026

# NOTICE NO. 14
## NEET-UG-2026

## Regarding Eligibility for CAP Round 2 for MBBS/BDS (Group-A) Courses for Academic Year 2026–27

Ref: 1. Social Justice and Special Assistance Department, Government Circular dated 04/09/2026.
2. Medical Education and Drugs Department, letter dated 08/09/2026.

The registration of eligible candidates of NEET UG 2026 for admission to MBBS/BDS (Group-A) courses for CAP-1 & CAP-2 for the academic year 2026–27 is completed.

As per the provisions of the NEET UG 2026 Information Brochure, candidates belonging to reserved categories, excluding OBC and SEBC, who had not submitted their Caste Validity Certificate upto the last date of registration were considered under the Open Category. Further, some candidates could not participate in the admission process as they did not fulfil the requisite eligibility criteria after being considered under the Open Category.

As per the Government Circular dated 04/09/2026, candidates belonging to the Scheduled Caste (SC), Vimukta Jati (VJ), Nomadic Tribes (NT), Other Backward Classes (OBC) and Special Backward Classes (SBC) categories have been granted an extension of three months from the date of the said Government Circular for submission of their Caste Validity Certificates for admission purposes.

In view of the aforesaid Circular, the Medical Education and Drugs Department, vide its letter referred to above, has decided, to permit candidates belonging to the **Scheduled Caste (SC), Vimukta Jati (VJ), De-notified Tribes (DT), Nomadic Tribes (NT), Other Backward Classes (OBC) and Special Backward Classes (SBC)** categories, who were earlier considered under the **Open Category** or were declared **ineligible on account of non-submission of the Caste Validity Certificate (CVC)**, to be considered under their respective reserved category.

This relaxation shall, however, be applicable only to those candidates who had **submitted the receipt/proof of application for obtaining the Caste Validity Certificate (CVC) at the time of registration**. Such candidates shall be considered under their respective reserved category, subject to fulfilment of all other applicable eligibility conditions and submission/production of the requisite Caste Validity Certificate within the prescribed period.

As a result, as a one time measure, the department has permitted to revise the final merit list dated 28/08/2026 for the ongoing CAP-2 round. The revised Final merit list will be published on the official website.

Consequently, the schedule for filling in **preferences for the CAP Round – 2 of MBBS/BDS (Group A) Courses is being extended up to 03.00 pm of 11/09/2026.** All concerned candidates shall take note of the same. Candidates who have already submitted their preferences and now wish to edit the preferences after declaration of the revised merit list can unlock and edit the preferences from their login within the given time schedule.

Candidates are advised to regularly visit the official website i.e.**www.mahacet.org** for notifications, updates and further instructions regarding the admission process.

Sd/-
Commissioner,
Maharashtra State Common Entrance
(Test) Cell, Mumbai

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.वैशिप्र-१०२६/प्र.क्र.८३/युजी २०२६/प्रवेश फेरी २/CVC/मुदतवाढ/२२१८ दिनांक : ०९/०९/२०२६

सुचना क्रमांक - १४
नीट युजी २०२६

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एमबीबीएस/बीडीएस (गट-अ) अभ्यासक्रम**
**केंद्रिभुत प्रवेश फेरी २ पात्रतेबाबत**

संदर्भ : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक ०४/०९/२०२६
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, यांचेकडील पत्र दिनांक ०८/०९/२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एमबीबीएस व बीडीएस (गट अ) अभ्यासक्रम प्रवेशासाठी नीट २०२५ पात्र उमेदवारांकडून नोंदणी करुन घेण्यात आली आहे. प्रवेश माहिती पुस्तिकेतील तरतूदीनुसार ज्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी (ओबीसी व एसईबीसी वगळून) नोंदणीच्या अंतिम दिनांकापर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गात सहभागी करुन घेण्यात आले होते तसेच काही उमेदवार हे खुल्या प्रवर्गात सहभागी केल्याने आवश्यक पात्रता पुण करत नसल्याने त्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यात आलेले नाही.

शासन परिपत्रक दिनांक ०४/०९/२०२६ अन्वये अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जाती (NT), इतर मागास (OBC) व विशेष मागास प्रवर्गातील (SBC) उमेदवारांना प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासन परिपत्रकाच्या दिनांकापासून ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जमाती/विमुक्त जाती (DT), भटक्या जमाती (NT), इतर मागासवर्गीय (OBC) तसेच विशेष मागासवर्गीय (SBC) प्रवर्गातील अशा उमेदवारांना, ज्यांचा यापूर्वी खुल्या प्रवर्गातून विचार करण्यात आला होता किंवा जात वैधता प्रमाणपत्र (CVC) सादर न केल्यामुळे अपात्र ठरविण्यात आले होते, अशा उमेदवारांना त्यांच्या संबंधित आरक्षित प्रवर्गातून विचार करण्यास परवानगी दिली आहे.

सदर शिथिलता केवळ अशाच उमेदवारांना लागू राहील, ज्यांनी प्रवेश नोंदणीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी केलेल्या अर्जाची पावती/अर्ज केल्याचा पुरावा सादर केला होता. अशा उमेदवारांचा, इतर सर्व लागू पात्रता अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, त्यांच्या संबंधित आरक्षित प्रवर्गातून विचार करण्यात येईल. तथापि, विहित कालावधीत आवश्यक जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे/उपलब्ध करून देणे उमेदवारास बंधनकारक राहील.

तद्नुषंगाने, एकवेळची विशेष बाब म्हणून, एमबीबीएस/बीडीएस अभ्यासक्रम प्रवेशासाठी दिनांक २८/०८/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) सुधारित करण्यास परवानगी दिली आहे. सुधारित अंतिम गुणवत्ता यादी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

त्याअनुषंगाने, एमबीबीएस/बीडीएस (गट-अ) अभ्यासक्रमांच्या **केंद्रिभुत प्रवेश फेरी २ साठी पसंतीक्रम (Preferences) भरण्याची मुदत वाढविण्यात येत असून, उमेदवारांना दिनांक ११/०९/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत पसंतीक्रम भरता येतील**. सर्व संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

ज्या उमेदवारांनी यापूर्वीच पसंतीक्रम नोंदविले/भरले आहेत आणि सुधारित अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांना त्यांच्या पसंतीक्रमामध्ये बदल/दुरुस्ती करावयाची असल्यास, विहित कालावधीत त्यांच्या उमेदवार लॉगिनमधून पसंतीक्रम अनलॉक करून त्यामध्ये आवश्यक ते बदल करता येतील.

उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेबाबतच्या अधिसूचना, अद्ययावत माहिती व पुढील सूचनांसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळास नियमितपणे भेट द्यावी.

स्वाक्षरी/-
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई